**वादीतर्फे श्री.एस.बी.फड वकिल यांच्यामार्फत उलटतपास शपथेवर सुरु.**

**०८.** हे खरे आहे कि, प्रतिवादी क्र.३ हे माझे कुटूंबाचे सदस्या किंवा नातेवाईक नाहीत. त्यांच्या वतीने साक्ष देण्यासाठी मला लिखीत अधिकारपत्र दिलेले नाही. मी ग्रामपंचायत अधिकारी म्हणुन पंचायत समिती अहमदपूर येथे कार्यरत आहे. सन २००० ते २०१२ या काळात मी अहमदपूर येथे, त्यानंतर जळकोट येथे २०१२ ते २०२३ कार्यरत होतो. त्यानंतर पुन्हा अहमदपूर येथे विनंती बदलीने आलो आहे. हे खरे आहे कि, २००३ ते २००५ या काळात माझेकडे मुळकी ग्रामपंचायतीचा पदभार होता. हे खरे आहे कि, दिनांक ३०.११.२००५ पर्यंत मी मुळकी ग्रामपंचायतीत कार्यरत होतो. हे खरे आहे कि, दिनांक ३०.११.२००५ नंतर प्रत्यक्ष ग्रामविकास अधिकारी म्हणुन मुळकी ग्रामपंचायतीशी माझा संबंध आला नाही. हे खरे आहे कि, माझेनंतर मुळकी ग्रामपंचायतीचा माझा कार्यभार मी श्री.एफ.एम.शेख यांना हस्तांतरीत केला. मी पदभार हस्तांतरीत केल्यानंतर त्या ग्रामपंचायतीचा कार्यभाराशी माझा काही संबंध राहत नाही असे म्हणता येत नाही. दिनांक ३०.११.२००५ नंतर ग्रामपंचायत मुळकी यांचा ग्रामसेवक म्हणुन त्या ग्रामपंचायतीची कोणतीही कर्तव्ये मी पार पाडलेली नाहीत, यास माझे सांगणे कि माझा कालावधीतील प्रकरणे आल्यानंतर मला तिथे जावे लागत असे. मी कोणकोणत्या तारखांना त्या ग्रामपंचायतीमध्ये माझा पदभार सोडल्यानंतरही जावुन काम केले हे मला आठवत नाही. हे खरे आहे कि, तेथील पदभार सोडल्यानंतर मुळकी गावातील ग्रामस्थांचा व माझा ग्रामपंचायतीच्या कामाच्या अनुषंगाने कोणताही सबंध राहिलेला नाही. हे खरे आहे कि, मुळकी येथुन बदली झाल्यानंतर ग्रामपंचायत चोबळी येथे कार्यरत होतो. हे खरे आहे कि, वादी चोबळी गावचे रहिवाशी व नागरीक नाहीत. हे खरे आहे कि, चोबळी येथे मी कार्यरत असताना वादीने कधीही चोबळी गावाच्या कारभारा विषयी माझेकडे संपर्क साधला नाही. वादीच्या मागणीप्रमाणे त्याचे कोणतेही काम मी चोबळी ग्रामपंचायतीत कामाला

असताना केलेले नाही हे खरे आहे. ग्रामपंचायत मुळकीच्या कामाविषयी वादीने माझेकडे मी मुळकी ग्रामपंचायतीचा कार्यभार सोडल्यानंतर कधीही संपर्क केलेला नाही यास माझे सांगणे कि त्यांनी माझे विरुध्द ग्रामपंचायत कामाविषयी तक्रारी अर्ज केला होता. असे १० ते १५ अर्ज होते त्यामुळे मला त्याची तारीख सांगता येत नाही. सन २००० ते २००६ या काळात वादीने माझेविरुध्द पंधरा अर्ज दिले, त्याचे तारखा मला सांगता येत नाही. त्या अर्जाच्या प्रमाणित प्रती न्यायालयात दाखल केलेल्या नाहीत. या अर्जांच्या प्रमाणित प्रती मला उपलब्ध झाल्यास मी दाखल करेन.

**०९.** हे खरे आहे कि, मुळकी ग्रामपंचायतमध्ये मी कार्यरत असताना दिनांक २३.०७.२००५ रोजी सरपंच आणि उपसरपंच निवडीची प्रक्रिया पार पडली. हे खरे आहे कि, ही प्रक्रिया ग्रामपंचायतीच्या प्रोसिडींग बुकात लिहीण्यात आली. हे खरे आहे कि, सदर प्रोसिडींग बुक हे शासकिय मालमत्ता आहे. हे खरे आहे कि, त्याचा ताबा ठेवणे, नोंदी ठेवणे हे माझे काम होते. हे खरे आहे कि, सदरचे प्रोसिडींग बुक मी तत्कालिन सरपंच असलेले प्रतिवादी क्र.२ यांच्या ताब्यात ठेवले. हे खरे आहे कि, दिनांक २५.०८.२००५ रोजीची प्रोसिडींग बुक ताब्यात दिल्या बद्यलची पावती मी लिहुन घेतली. आता मला निशाणी ६० वरील पावती दाखवली. ती तिच आहे.

प्रश्न - आपणास आपल्या ताब्यातील शासकिय दस्ताऎवज इतर कोणाच्याही ताब्यात देता येत नाही, हे म्हणणे खरे आहे का ?

उत्तर - सरपंचाच्या ताब्यात त्यांनी मागणी केल्यानंतर असे दस्ताऎवज देता येतात.

**१०.** सरपंचाना असे कागद देता येतात याची नियमावली मी हजर करु शकतो. सदर प्रोसिडींग बुक प्रतिवादी क्र.२ कडुन ताब्यात घ्यावे असा वरिष्ठांनी मला आदेश दिला होता हे म्हणणे बरोबर आहे. आता मला निशाणी ६२ हे गट विकास अधिकारी पंचायत समिती अहमदपूर यांचे पत्र दाखवले. ते तेच आहे. हे खरे आहे कि, प्रतिवादी क्र.२ विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करावा असे या पत्रात निर्देश आहेत. मी वरिष्ठांच्या आदेशाचे पालन न केल्याने माझे विरुध्द ग्रामपंचायत अधिनियम १९७९ प्रमाणे कार्यवाही करण्याबद्यल अहवाल सादर झाला. आता

मला निशाणी १०२ दाखवला, सदरचा अहवाल तोच आहे. हे खरे आहे कि, मी आणि प्रतिवादी क्र.३ यांच्या सेवापुस्तकामध्ये त्या अनुषंगाने नोंदी घेण्यात आल्या. निशाणी ६३ व ६४ या त्याच नोंदी आहेत. दिनांक ०१.०२.२००८ रोजी सदरचे प्रोसिंडींग बुक तत्कालिन ग्रामसेवक श्री.एफ.एम.शेख यांच्याकडे प्रतिवादी क्र.२ ने जमा केले हे खरे आहे. निशाणी ६१ आता मला दाखवली ते तेच पत्र आहे. आता मला माझी मासीक टुन डायरी निशाणी ६५ दाखवली, ती बरोबर आहे. दिनांक १०.०७.२००७ रोजी मी चोबळी ग्रामपंचायतीमध्ये कामकाज केले होते असा त्यात उल्लेख आहे. हे खरे आहे कि, ही डायरी मीच लिहीतो व वरीष्ठ कार्यालयात जमा करतो. दिनांक १०.०७.२००७ रोजी माझी रजा नव्हती व त्यादिवशी मी कामावर हजर होतो. मी वरिष्ठांच्या तोंडी आदेशान्वये जिल्हा पोलीस प्रमुख लातूर यांचेकडे त्याचदिवशी गेलो होतो. हे खरे आहे कि, दिनांक ११.०७.२००७ रोजी मी वादी विरुध्द तक्रार दिली व त्याच्या विरुध्द गुन्हा नोंद झाला. गुन्हा दाखल झाल्यानंतर वादीला दोन दिवस पोलीस कोठडी व एक दिवस न्यायालयीन कोठडी झाली याची मला माहिती नाही. वादी विरुध्द अनेक वर्तमानपत्रामध्ये खंडणीखोरास अटक अशास्वरुपाच्या बातम्या दिनांक १२.०७.२००७ रोजी छापुन आल्या असल्याचे मला माहिती नाही. या बातम्या मी दिलेल्या खोटी वर्दीमुळे छापुन आल्या होत्या, हे खरे नाही. हे खरे नाही कि, त्या त्या वर्तमानपत्राच्या वार्ताहरांना मीच ही बातमी पुरविली होती. एखाद्या व्यक्तीच्या बाबतीत गुन्हयाच्या अनुषंगाने वर्तमानपत्रात बातमी छापुन आली तर त्या व्यक्तीची बदनामी होते, यास माझे सांगणे ती व्यक्ती अगोदरच बदनाम असल्यास अशी बदनामी होत नाही. हे खरे आहे कि, या गुन्हयावरुन दाखल झालेला खटला १२ वर्षे, ०६ महिने, ०३ दिवस चालला. या गुन्हयामध्ये प्रतिवादी क्र.२ व ३ यांची टिपणे पोलीसांनी नोंदविली याची मला माहिती नाही. हे खरे आहे कि, फौजदारी खटला क्र.१५८/२००७ मध्ये माझी अंशत: तपासणी झालेली आहे. त्या खटल्यात मुद्येमालाचे दोन नोटांचे क्रमांक जुळत नव्हते, माझी येथुन बदली झाली होती आणि पोलीस अधिका-यांचे सुध्दा जबाब झाले नाहीत. दिनांक २१.१२.२००९ रोजी मी त्या खटल्याकामी न्यायालयात हजर होतो याबाबत मला

आठवत नाही. मला ती तारीख आठवत नाही. त्याचदिवशी माझी साक्ष नोंदविली, यास माझे सांगणे की, माझी साक्ष नोंदविली परंतु तारीख आठवत नाही.

**११.** हे खरे आहे कि, फौजदारी खटला क्र.१५८/२००७ मध्ये सरकार पक्षास मदत करण्यासाठी मी विधिज्ञ श्री.एस.एस.कांबळे यांची नियुक्ती केली होती. त्यांचे वकिलपत्र मी त्या खटल्याच्या निकालापर्यत रद्द केले नव्हते याबाबत मला आठवत नाही. सन २००७ पासुन श्री.कांबळे वकिल आणि माझा संपर्क होत असे हे खरे आहे. दिनांक २४.०१.२०१२ रोजी त्या खटल्यात मला काढलेले समन्स मला तामील झाले होते, हे खरे आहे. दिनांक २१.०३.२०१२ रोजीही मला साक्षी समन्स मिळाले होते, याबद्यल मला तारीख आठवत नाही. दिनांक ०४.०७.२०१४ रोजी मला न्यायालयाने जामीनपात्र वारंट काढले, याबद्यल मला माहिती नाही. दिनांक ०७.१०.२०१४, १८.११.२०१४ रोजी सुध्दा मला जामीनपात्र वारंट काढले होते, याबद्यल मला सांगता येणार नाही कारण माझी बदली झाली होती. हे खरे आहे कि, मी ज्या कार्यालयातुन बदलुन गेलो त्या कार्यालयात मी कोठे बदलुन गेलो याची नोंद असते. तो खटला मला समन्स वारंट काढुनही मी गैरहजर असल्याने प्रलंबित राहिला, यास माझे सांगणे कि त्याबद्यल मला माहितीच नव्हते. प्रकरण रद्द करावे म्हणुन वादीने मुंबई उच्च न्यायालयात माझे विरुध्द याचिका केली होती याची मला माहिती नाही. त्यात मी पक्षकार क्र.२ होतो, याची मला माहिती नाही. त्या याचिकेची नोटीस मला मिळाली होती, हे खरे नाही. मा.उच्च न्यायालयाने त्याकामी मुळ प्रकरण जुने आणि जेष्ठ नागरीकाविरुध्द असल्याने चार महिन्यात निकाली करण्याचे निर्देश दिले याची मला माहिती नाही. दिनांक ०३.०१.२०१९ रोजी मला पुन्हा साक्षीसमन्स काढले, याची मला माहिती नाही. दिनांक ०८.०७.२०१९ रोजी मला व आमच्या साक्षीदारांना त्या खटल्याच्या समन्सची बजावणी झाली होती, याची मला माहिती नाही. दिनांक २०.०७.२०१९ रोजी मा.न्यायालयाने मी व साक्षीदार साक्षीकामी हजर राहत नाही म्हणुन पुरावा बंद केला, याबद्यल माझे सांगणे कि, मला कोणतेही समन्स मिळालेले नव्हते. पुरावा बंद आदेशाविरुध्द आम्ही आक्षेप घेणारा अर्ज किंवा

अपील केले नाही. मी सांगतो कि मला त्याबद्यल माहितीच उशीरा मिळाली. ती माहिती निश्चित कधी मिळाली हे मला सांगता येत नाही. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी संगनमत करुन वादीला खोटया गुन्हयात गावले हे म्हणणे खरे नाही. त्याकामी साक्षीला हजर न राहिल्याने वादीला दोषमुक्त करण्यात आले, यास माझे सांगणे कि, आम्हाला साक्षीसमन्सची माहितीच नव्हती. फौजदारी खटला क्र.१५८/२००७ मधील न्यायनिर्णय मी वाचला आहे.

**१२.** वादीची दोषमुक्तता झाल्यानंतर वादीने मला वकिंलाकरवी नोटीस पाठवुन मी त्यांची माफी मागावी आणि नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी केली होती याबद्यल मला माहिती नाही. दिनांक २९.०९.२०२० रोजी ती नोटीस मला मिळाली, हे म्हणणे खरे नाही. निशाणी ७३ ही पोचपावती मला नोटीस मिळाल्या बाबतची आहे, याबद्यल मला माहिती नाही. प्रतिवादी क्र.३ ला सुध्दा ही नोटीस दिनांक २९.०९.२०२० रोजी मिळाली, यास माझे सांगणे कि, तशी ती मिळाली असावी. सरतपास देण्यापुर्वी मी प्रतिवादी क्र.३ शी चर्चा केली होती. त्यांच्याकडुन मी त्या प्रकरणातील दाखल कागदपत्राविषयी व जबाबाविषयी माहिती घेतली होती. नोटीस मिळुनही मी वादींची माफी मागितली नाही व नुकसान भरपाई दिली नाही म्हणुन हा दावा दाखल केला, यास माझे सांगणे कि, गुन्हा खरा होता त्यामुळे माफी मागण्याचे कारण नाही. या नोटीसचे उत्तर वादीला पाठवले होते किंवा कसे हे मला माहिती नाही. ती नोटीस माझे वकिलांना माहिती होती. माझे वकिलांनी त्या नोटीसचे उत्तर पाठविले नाही, यास माझे सांगणे कि, माझा आणि वकिलाचा संपर्क झाला नाही. हे खरे नाही कि, या दाव्याचे समन्स मला पंचायत समिती जळकोट या पत्यावर मिळाले. प्रतिवादी क्र.३ चे या दाव्याचे समन्स पंचायत समिती निलंगा या पत्यावर त्यांना मिळाले हे खरे नाही. या दाव्याबद्यलची माहिती मला माझे वकिलांकरवी मिळाली. ती कधी मिळाली हे सांगता येत नाही. या दाव्यात हजर झाल्यानंतर मी फोजदारी क्र.१५८/२००७ विरुध्द मा.जिल्हा न्यायालय, अहमदपूर यांच्याकडे विलंबासह अपील केले होते, हे खरे आहे. ते अपील फेटाळले हे खरे आहे. त्या निकालाविरुध्द मी वरीष्ठ न्यायालयात अपील केले नाही. वादी

शेतकरी आहे याबद्यल मला माहिती नाही. वादीला उमरगा कोर्ट ता.अहमदपूर येथे गट क्र.४४१ मध्ये ५८ आर जमीन आहे याची मला माहिती नाही. मौजे मुळकी येथे गट क्र.११७ मध्ये वादीला ६३ आर जमीन होती याची मला माहिती नाही. गट क्र.११७ मधील जमीन अंतेश्वर माधव भंडे यांना वादीस विकावी लागली याची मला माहिती नाही. उमरगा कोर्ट येथील गट क्र.४४१ मधील जमीन वादीला राजश्री सावंत यांना विकावी लागली याबद्यल मला माहिती नाही. या मिळकती विकण्याचे कारण म्हणजे मी त्यांच्या विरुध्द दाखल केलेला खटला लढण्यासाठीची कायदेशिर लढाई करण्यास लागलेला पैसा होय, याबद्यल मला काही माहिती नाही. वादीविरुध्द मी दाखल केलेल्या खटल्या शिवाय अन्य कोणताही फौजदारी खटला दाखल झालेला नाही याची मला माहिती नाही. हे खरे नाही कि, वादीची मुळकी व आजुबाजुच्या गावात चांगली प्रतिष्ठा आहे. प्रतिवादी क्र.३ विरुध्द त्याने ग्रामसेवकाला वाचवण्यासाठी खोटी शौचालय बांधल्याचा अहवाल तयार केला म्हणुन त्यांच्या विरुध्द कार्यालयीन कार्यवाही झाली होती, हे खरे नाही. त्या अनुषंगाने मजकुर वर्तमानपत्रात छापुन आला होता, हे खरे आहे. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी संगनमताने यांनी वादीला खोटया गुन्हयामध्ये अडकवुन त्याच्या अब्रुचे धिंडवडे काढले, हे म्हणणे खरे नाही. खोटया गुन्हयामुळे वादीला आर्थिक, मानसिक, शारिरीक त्रास झाला, हे खरे नाही. हे खरे आहे कि, प्रतिवादी क्र.२ व माझे संबंध मी मुळकी ग्रामपंचायतीत कार्यरत असताना चांगले होते. तेथुन बदली झाल्यानंतर माझे व त्यांचे बोलणे आहे यास माझे सांगणे कि, या कामाच्या निमित्ताने आहे. प्रतिवादी क्र.३ व माझे आम्ही एकाच कार्यालयातील असल्याने घनिष्ठ संबंध आहेत असे म्हणता येत नाहीत. माझे कामानिमित्त संबंध आहेत. फोनवरुन आमचे संभाषण होते मात्र भेटीगाठी होत नाहीत. त्यांना मी शेवटचे कधी भेटलो हे मला आठवत नाही. जिल्हा कोर्टात वादीविरुध्दच्या फौजदारी खटल्यात मी अपील केलो त्यावेळी मी प्रतिवादी क्र.३ भेटलो. तसेच एक महिन्यापुर्वी वादीच्या साक्षीदारांच्या साक्षीवेळी आम्ही भेटलो होतो. हे खरे आहे कि, जिल्हा न्यायालयातील अपील दाखल करणे ते एक महिन्यापुर्वी त्यांची आणि माझी भेट या दरम्यान माझे व त्यांचे भेटणे झाले नाही. विनाकारणचे आरोपीला १२ वर्षे, ०६ महिने, ०३ दिवस न्यायांसाठी झगडावे लागले व त्यास कारणीभुत आम्ही आहोत

हे म्हणणे खरे नाही. हे म्हणणे खरे नाही कि, आज रोजी मी खोटे शपथपत्र दाखल केले व खोटी साक्ष दिली आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

**श्रवणोत्तर स्विकृत**

**स्वाक्षरीत/-**
**( एस.एन.सरडे )**
**दिनांक १२/०९/२०२५.** **दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.**